326



महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत
निवडणुकांमध्ये उमेदवाराने केलेल्या
खर्चाचा हिशोब सादर करण्याबाबत.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जून २०१०

### आदेश

क्रमांक रानिआ./मप-२००९/प्र.क्र. १३/का. ५ व का. ६.—भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ चे कलम १८ अ(२), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४ (२), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० अ(२) यानुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून मी, नीला सत्यनारायण, राज्य निवडणूक आयुक्त, मुंबई महानगरपालिका, नागपूर शहर महारगरपालिका, इतर प्रांतिक महानगरपालिका व नगरपरिषदा/ नगरपंचायत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी निवडणूक खर्चाची माहिती शपथपत्रासह राज्य निवडणूक आयोगाने विहित केल्यानुसार, निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीमध्ये सादर न केल्यास अशा उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबतचे मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ चे कलम १६ (१ई), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १५ (४) (अ) व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १० (१ई) चे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करीत आहे आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६ चे पोट-कलम (१ड) चे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करीत आहे.

नीला सत्यनारायण,
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT